# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati@dtemaharashtra.gov.in
Website: www.jdroamt.org

Ph.No. :(०७२१) २५७३०२०, २५७२५७७
Fax No. : (०७२१) २५७ ७३२३


क्रमांक :- विकाअ/शिक्षण/माहीती/२०१९/२४८७
दिनांक :- ८/११/२०१९

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व अभियांत्रिकी पदवीका संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील विविध पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या अनुषंगाने फिडबँक फॉर्म भरुन घेणबाबत.**

**संदर्भ :-** १.मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- १०/एडीएम/पदविका/२०१९/१२०४ दि. २ नोव्हेंबर २०१९.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील विविध तांत्रिक पदवीका अभ्यासक्रमांचे प्रवेश वाढविण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या मार्गदर्शनाखाली तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई तसेच महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्या सयुक्त परिश्रमाने राज्यातील तंत्रनिकेतनानी समुपदेशन सभा, जनजागृती मोहीम जाहीराती अश्या विविध उपक्रमाव्दारे आपले योगदान दिलेले आहे. त्याचाच परिणाम म्हणून शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये विविध तांत्रिक अभ्यासक्रमाचे प्रवेश हे मागील शैक्षणिक वर्षापेक्षा १० टक्काने वाढलेले आहे. त्यादृष्टीने शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील तांत्रिक पदवीका अभ्यासक्रमातील प्रवेशाच्या अनुषंगाने सर्व तंत्रनिकेतनातील प्राचार्य व प्रवेशीत विद्यार्थ्याकडून फिडबॅक घेण्याबाबतचे ठरविलेले आहे. त्याअनुषंगाने आपल्या तंत्रनिकेतनातील प्राचार्य व संस्थेत एकुण प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी ५ टक्के विद्यार्थ्याकडून फीडबॅक घेऊन फिडबॅक फॉर्म भरुन घेऊन **दिनांक ८/११/२०१९** पर्यंत या कार्यालयास सादर करण्यास कळविलेले आहे तथापी अजुनपर्यंत या कार्यालयास अप्राप्त आहे त्यामुळे सदरची माहीती तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांना सादर करणे शक्य झालेले नाही.

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, सदरची माहीती कोणत्याही परिस्थितीत या कार्यालयास **दिनांक ११/११/२०१९ पर्यंत** या कार्यालयास सादर करावी जेणेकरुन सदर माहीती तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांना सादर करणे शक्य होईल.

**सहपत्रे :- वरीलप्रमाणे.**

सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना ई-मेल व संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

E:\backup old\backup kadam\all manish letter ghts50 (Autosaved).docx